महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ मधील कलम ३७ रद्द झाले असल्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

शासन परिपत्रक क्र.एमसीआय-२०००/२५०८/प्र.क्र.४१६/२०००/अधिनियम
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक :- २० सप्टेंबर, २००५

वाचा:- शासन निर्णय क्र.एमआयएस-२०००/२५३०/प्र.क्र.३४/०१/अधिनियम, दि.१८.३.२००२.

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ मधील कलम ३७ च्या तरतूदीनुसार सदर कलमातील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या अनोंदणीकृत वैद्यक व्यवसायींना राज्यातील ग्रामीण भागात वैद्यकिय व्यवसाय करण्यास अनुमती देण्याकरिता शासन निर्णय क्र.एमआयएस २०००/२५३०/ प्र.क्र.३४/०१/अधिनियम, दि.१८.३.२००२ नुसार मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली होती. आता महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ यात महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, २००५ नुसार सुधारणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, २००५ नुसार, मुख्य अधिनियम महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ मधील कलम ३७ रद्द करण्यात आले आहे. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, २००५ हा दि.२५ ऑगस्ट, २००५ रोजी असाधारण राजपत्र भाग-४ मध्ये प्रसिध्द झाला आहे. हे पहाता शासन निर्णय क्र. एमआयएस-२०००/२५३०/प्र.क्र.३४/०१/अधिनियम, दि.१८.३.२००२ हा दि.२५ ऑगस्ट , २००५ पासून आपोआपच रद्द झाला आहे.

२. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, २००५ ची प्रत सोबत जोडली आहे. सदर अधिनियमातील कलम ३ मध्ये स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे, रद्द करण्यात आलेल्या कलम ३७ नुसार ग्रामीण भागात वैद्यकिय व्यवसाय करण्याकरिता यापूर्वी देण्यात आलेली परवानगी, मग ती जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी दिलेली असो, अथवा न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयानुसार दिलेली असो, अशा प्रकारची कोणतीही परवानगी दि.२५.८.२००५ पासून रद्द ठरते.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.ना.रणखांबे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई
सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, ग्राम विकास व जलसंधरण विभाग,मंत्रालय, मुंबई
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई
सर्व जिल्हयाचे जिल्हाधिकारी, (त्यांना विनंती करण्यात येते की सदर शासन निर्णयाच्या प्रती त्यांनी त्यांच्या जिल्हयातील सर्व तहसिलदार, ग्रामसेवक व अन्य संबंधितास पाठवाव्यात.)
पोलिस महासंचालक, मुंबई

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य यसयय ार्यकारी अधिकारी,
सर्व पोलिस आयुक्त,
सर्व जिल्हयांचे जिल्हा पोलीस अधिक्षक,
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक,
सर्व अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,
सर्व जिल्हयाचे जिल्हा आरोग्य अधिकारी,
सर्व जिल्हयाचे जिल्हा माहिती अधिकारी,
संचालक, आयुर्वेद संचालनालय,मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन,मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल, मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल,मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई
वैद्यकिय शिक्षण विभागातील सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी
निवडनस्ती (अधिनियम)

3137

रजिस्टर्ड नं.टीईसीएच/४७-२०२/एमबीआयम/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, ऑगस्ट २५, २००५/भाद्र ३, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

### महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Medical Practitioners (Amendment) Act, 2005 (Mah.Act. No.XL of 2005), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A.M.SHINDEKAR
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No.XL OF 2005.

***(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", dated the 25th August 2005).***

***An Act further to amend the Maharashtra Medical Practitioners Act, 1961.***

Mah. XXVIII of 1961

WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Medical Practitioners Act, 1961, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-sixth Year of the Republic of India as follows :-

Short title.

1. This Act may be called the Maharashtra Medical Practitioners (Amendment) Act, 2005.

Mah. XXVIII of 1961

Delection of section 37 of Mah. XXVIII of 1961.

2. Section 37 of the Maharashtra Medical Practitioners Act, 1961 (hereinafter referred to as "the principal Act") shall be deleted.

Removal of doubt.

3. For removal of doubt it is hereby declared that, section 37 of the principal Act having been deleted, notwithstanding anything contained in any judgement, decree, order or direction of any Court or in a licence or instrument, on or after the date of publication of this Act in the Official Gazette, the permission or liberty granted to any person, who was otherwise not eligible for being registered under the principal Act, to practise in rural areas by virtue of the provisions of the said section 37, shall be deemed to have been cancelled and the privileges conferred on such person shall be deemed to have been withdrawn.